वर्ष - ५ | अंक - 44 | पाने ४ | किंमत - ४ रुपये | www.Bharatsangram.com | EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE | Bharatsangram@gmail.com | आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. MAHMAR/2020/79677

दैनिक वाशिम, मंगळवार, २० जानेवारी २०२६ सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

**TRENDING NEWS**



**रश्मिका मंदानाने सांगितली सिकंदर फ्लॉप होण्याची कारणे:म्हणाली- मी जेव्हा स्क्रिप्ट ऐकली तेव्हा ती वेगळी होती, शूटिंग दरम्यान कथा बदलली**

पान 3 वर

## थोडक्यात

### दोघांना कारने चिरडले

**कळंब :** कळंब-नागपूर मार्गावर अर्पण बारसमोर उभ्या असलेल्या दोघांना भरधाव कारने जोरदार धडक दिल्याची घटना घडली. यात भीमराव लक्ष्मण शेंडे (६८) आणि गजानन माराती कोवे (४५, रा. राजूर) हे जखमी झाले आहेत. ही घटना १६ जानेवारी रोजी दुपारी १ ते २ च्या सुमारास घडली. फिर्यादी सुजल सुभाष थुल (१८, रा. स्वप्न नगरी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पांढऱ्या रंगाच्या होंडा सिटी कार (एमएच ०४ ईसी ०४३८) चालकाने आपले वाहन निष्काळजीपणे चालवून रस्त्याच्या कडेला गप्पा मारत उभ्या असलेल्या दोघांना धडक दिली. अपघातानंतर कारचालकाविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ट्रॅक्टर जप्त

**आर्णी :** आर्णी तालुक्यातील खंडाळा ते जवळा रोडवर पोलिसांनी कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला. ही कारवाई १६ जानेवारीच्या मध्यरात्री करण्यात आली. आरोपी संजय शालिक चव्हाण (४३, रा. जवळा) हा आपल्या सोनालिका कंपनीच्या विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून १ ब्रास रेतीची चोरी करून वाहतूक करत होता. पोलिसांनी ६ लाख ५ हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर आणि रेतीचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात चोरी आणि गौण खनिज कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**पुसद :** कलर प्रिंटर आणि केमिकलचा वापर करून ५०० रुपयांच्या बनावट नोटा छापणाऱ्या टोळीला पुसद शहर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. ही धडाकेबाज कारवाई १६ जानेवारी रोजी सायंकाळी बोरी (खु) येथील कालव्यालगत करण्यात आली. संतोष जगदेवराव सूर्यवंशी (५०, रा. कळमनुरी), गणेश धर्मा गायकवाड (४६, रा. आझाद चौक, पुसद) आणि विनोद केरबाजी कुरडे (५०, रा. बोरी खु) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून नोटा छापण्याचे साहित्य, प्रिंटर, ५०० दराच्या १५ बनावट नोटा, अर्धवट छापलेले ३० कागद, केमिकल बॉटल, मोबाईल आणि दोन दुचाकी असा एकूण १ लाख ९० हजार ६७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### ५४ हजारांचा गोवंश लंपास

**पुसद :** पुसद तालुक्यातील काळी दौलत (ता. महागाव) येथून अज्ञात चोरट्यांनी चारचाकी वाहनाचा वापर करून जनावरांची चोरी केली. ही घटना ७ जानेवारी रोजी पहाटे ४ वाजता घडली. चोरट्यांनी एका सिल्व्हर रंगाच्या चारचाकी वाहनातून फिर्यादीची ४ वर्षे वयाची कालवड आणि गावकऱ्यांची इतर जनावरे असा एकूण ५४ हजार रुपये किमतीचा गोवंश चोरून नेला. १७ जानेवारी रोजी दाखल तक्रारीवरून पुसद ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस नियोजन आवश्यक

## ना.दत्तात्रय भरणे : पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण सभा संपन्न

भारत संग्राम | प्रतिनिधी




**वाशिम :** जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस व परिणामकारक नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने जिल्ह्यासाठी मंजूर केलेला निधी कोणत्याही परिस्थितीत व्यपगत होऊ न देता तो वेळेत व योग्य कामांसाठी वापरला गेला पाहिजे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी परस्पर समन्वय राखून काम केल्यास विकासकामांना निश्चितच गती मिळते. पायाभूत सुविधा, शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्यायाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सामान्य नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळेल, यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनबद्ध व जबाबदारीने कार्य करावे.असे प्रतिपादन राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण सभा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आली.यावेळी ना.श्री.भरणे दुरदृश्यप्रणालीव्दारे आढावा सभेत बोलत होते. सभेला विधानसभा सदस्य आ. श्याम खोडे, आ.सई डाहाके, विधानपरिषद सदस्य आ.किरणराव सरनाईक यांच्यासह जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, परिविक्षाधीन भाप्रसे अधिकारी आकाश वर्मा, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सहाय्यक नियोजन अधिकारी संजय राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. तर खासदार संजय देशमुख व खासदार अनुप धोत्रे हे दुरदृश्य प्रणालीद्वारे सभेत सहभागी झाले होते. सभेदरम्यान जिल्ह्यातील विविध विकास योजनांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सादर केली. या आढावा सभेत दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समिती सभेच्या ईतिवृत्तावरील कार्यवाहीचा अनुपालनाचा आढावा, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/अनुसूचित जाती उपयोजना/ओटिएसपी) सन २०२६–२७ च्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६ मधील पुनर्विनियोजन प्रस्तावांतर्गत बचत व अतिरिक्त मागणीचे प्रस्ताव सादर करून त्यावर चर्चा करण्यात आली. सभेत परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले, जिल्हा नियोजन समिती ही जिल्ह्याच्या विकासाचा महत्त्वाचा मंच असून, या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या कामांवर शासनाच्या गाईड लाईन प्रमाणे काटेकोर अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व ओटिएसपी योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करून त्यावर कार्यवाही करण्यात येईल. जिल्ह्याच्या विकासासाठी प्रशासन सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने पारदर्शक व परिणामकारक कामकाज करेल. उपस्थित समिती सदस्यांनी जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. खासदार श्री. संजय देशमुख यांनी जिल्ह्यातील एमआयडीसी संदर्भात हळदी उद्योगासाठी स्वतंत्र प्लॉट उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच रुग्णालयांनी तात्काळ रुग्णांची माहिती ऑनलाइन नोंदणी करावी आणि सिंचन विहिरींच्या संदर्भात कुठेही लाभार्थी शेतकऱ्यांकडून पैसे घेण्यात येऊ नयेत, अशी स्पष्ट सूचना केली. आमदार श्याम खोडे यांनी मंगरूळपीर येथील एमआयडीसीमध्ये वापरात नसलेले प्लॉट परत घेऊन ते वापरात आणण्याबाबत मुद्दा उपस्थित केला. आमदार किरणराव सरनाईक यांनी जिल्ह्यातील शाळांवर सोलर पॅनल बसविण्यासाठी वार्षिक आराखड्यात समावेश करावा, अशी मागणी केली. आमदार सौ. सई डाहाके यांनी दलित वस्त्यांसाठी प्राप्त झालेला निधी अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आणून दिले.

# माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे विद्यालयासाठी अभिमानास्पद - प्राचार्य सचिन खरात

भारत संग्राम | प्रतिनिधी





**वाशिम :** जवाहर नवोदय विद्यालयाचा २५ वर्षांचा प्रवास हा गुणवत्ता, शिस्त आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा गौरवशाली इतिहास आहे. या प्रवासात माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत मिळवलेले यश हे शाळेसाठी अभिमानास्पद आहे. माजी विद्यार्थ्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि योगदान हे सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरते. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग सातत्याने मिळणे आवश्यक असून, अशा मेळाव्यांमुळे पिढ्यांमधील नाते अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य सचिन खरात यांनी केले.

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पी.एम.श्री. जवाहर नवोदय विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून प्राचार्य श्री. खरात बोलत होते. यावेळी जवाहर नवोदय विद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. मनीष पावसे (नेत्ररोग तज्ञ), डॉ. सचिन साळवे (नेत्ररोग तज्ञ), सारिका कंसरे (व्याख्याता), मनोहरराव नाईक (विज्ञान ज्युनियर कॉलेज, कोंडाळा महाली) तसेच विकी खोब्रागडे (क्रिकेट प्रशिक्षक) उपस्थित होते. या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे उद्दिष्ट माजी विद्यार्थ्यांना एका समान व्यासपीठावर एकत्र आणणे, परस्पर संबंध दृढ करणे आणि शाळेच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे हे होते. उपप्राचार्य श्री. सुभाष लष्करी यांनी आपल्या भाषणात विद्यमान आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये सतत संवाद आणि सहकार्याची गरज अधोरेखित केली. या रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्याच्या यशस्वी आयोजनात माजी विद्यार्थी प्रभारी राजेश कुमार ठाकूर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मेळाव्यादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक व व्यावसायिक अनुभव शेअर केले तसेच सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रम आणि सौहार्दपूर्ण संवादामुळे कार्यक्रम अधिकच संस्मरणीय ठरला. शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आणि सामूहिक सहभागाची प्रतिज्ञा घेऊन या रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेळाव्याचा उत्साहात समारोप झाला

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभा

भारत संग्राम | प्रतिनिधी



**वाशिम :** राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

आढावा सभेत दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समिती सभेचे ईतिवृत्ताचे कार्यवाहीचा अनुपालन अहवाल व ईतिवृत्त कायम करणे,जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/अनु. जाती उपयोजना/ओटिएसपी) सन २०२६-२७ च्या प्रारुप आराखडयास मान्यता प्रदान करणे,जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ मधील पुनर्विनियोजन प्रस्ताव अंतर्गत बचत व अतिरीक्त मागणी प्रस्ताव सादर करणे व परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय आदी बाबींचा समावेश आहे.असे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, वाशिम यांनी कळविले आहे.

# भारतीय सैन्य दिनानिमित्त रॅलीत एनसीसी कॅडेट्सचा सहभाग

भारत संग्राम | प्रतिनिधी



**वाशीम :** 'भारतीय सैन्य दिना'चे औचित्य साधून १५ जानेवारीला स्थानिक श्री बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सने शहरात भव्य रॅलीचे आयोजन केले होते. या उपक्रमांतर्गत कॅडेट्सनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील 'जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय' येथे भेट देऊन सैनिकांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

हातात तिरंगा आणि 'भारतीय सेनेचा विजय असो' अशा घोषणा देत एनसीसी कॅडेट्सनी वाशीम शहरात रॅली काढली. तरुण पिढीमध्ये शिस्त, राष्ट्रप्रेम आणि भारतीय सेनेप्रती आदर निर्माण व्हावा, हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता. सैनिक कल्याण कार्यालयात पोहोचल्यानंतर, तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कॅडेट्सचे स्वागत केले. यावेळी आयोजित चर्चासत्रात कॅडेट्सनी माजी सैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी आणि त्यांच्या पाल्यांसाठी शासनाकडून राबवल्या जाणाऱ्या विविध योजना. सवलती व मदत, शिक्षण, आरोग्य आणि पुनर्वसनासाठी मिळणाऱ्या सोयी-सुविधा आदी विविध विषयावर मार्गदर्शन मिळवले. याप्रसंगी सैनिक कल्याण संघटक संजय यलमर यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सैन्याचे महत्त्व आणि देशसेवेची संधी कशी प्राप्त करावी, यावर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच शिवशंकर झाडोकार यांनी सैनिक कल्याण मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाला विष्णू बुंदे, रवींद्र डोंगरदिवे यांच्यासह कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे एनसीसी कॅडेट्सना केवळ सैन्य दलाच्या बलिदानाची माहितीच मिळाली नाही, तर त्यांच्या मनात भविष्यात देशसेवेसाठी सज्ज होण्याची प्रेरणाही निर्माण झाली. या सर्व कॅडेट्स यांचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, एनसीसी अधिकारी अमोल काळे व सर्व शिक्षकवृंद यांनी कौतूक केले.

# पतंजली फूड्स लिमिटेड व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ साजरा

भारत संग्राम | प्रतिनिधी



**वाशिम :** पतंजली फूड्स लिमिटेड आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. "सडक सुरक्षा, जीवन रक्षा" ही थीम वापरून वाहनचालक, स्वार व पादचारी यांच्यात वाहतुकीचे नियम, सुरक्षित ड्रायव्हिंग सवयी आणि जबाबदार वर्तनाबाबत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान १ ते ३१ जानेवारी २०२६ अंतर्गत मोफत नेत्र तपासणी, शाळांमध्ये कार्यशाळा तसेच अपघात टाळण्यासाठी विविध जनजागृती कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला. रस्ते अपघातांमुळे होणारी जीवितहानी रोखणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. हा रस्ता सुरक्षा जागरूकता कार्यक्रम पतंजली फूड्स लिमिटेड वाशीम आणि वाशीम येथील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक मोहिनी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी मोटर वाहन निरीक्षक मोहिनी मोरे, रवींद्र येवतकर (मानवसंधान व प्रशासन प्रमुख), शिवम सैनी (सुरक्षा अधिकारी), अमित शर्मा (मानवसंधान व प्रशासन) तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्ते दुचाकी चालवताना हेल्मेट व चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्ट वापरणाऱ्या वाहनचालकांना प्रेरणादायी व सुरक्षा जागरूकता बक्षिसे देण्यात आली. प्रत्येक वाहनचालकाने हेल्मेट व सीट बेल्टचा नियमित वापर करावा, याचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. रस्ते अपघात टाळण्यासाठी सुरक्षित वाहन चालवणे, हेल्मेट व सीट बेल्ट वापरणे याबाबत पतंजली फूड्स लिमिटेड टीम व मोटर वाहन निरीक्षक मोहिनी मोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा नियमांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात रवींद्र येवतकर (मानवसंधान व प्रशासन प्रमुख), शिवम सैनी (सुरक्षा अधिकारी), अमित शर्मा (मानवसंधान व प्रशासन), सुदीप भोयर, सागर वाघ, वैभव अंभोरे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमास सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप व लेखाधिकारी उमेश तिवारी यांचे सहकार्य लाभले.

# हिंद-दी-चादर' कार्यक्रम जनजागृती उपक्रमाच्या अंमलबजावणीचा लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घेतला आढावा

## लातूर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये मंगळावर, बुधवारी प्रभात फेरीचे आयोजन

भारत संग्राम | प्रतिनिधी



**लातूर :** हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास सर्व विद्यार्थी व समाजातील नागरिकांपर्यंत पोहचावा, यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष उपक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक शनिवारी घेण्यात आली. सर्व आस्थापनांच्या शाळांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्य कार्यक्रम राज्यस्तरीय समागम समिती व राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत होत आहे. या अनुषंगाने शिक्षण विभागाने हाती घेतलेल्या जनजागृती कार्यक्रमाचा आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण सहाय्यक संचालक संजय पंचगल्ले, प्राथमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी संजय पारसेवार, माध्यमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी मधुकर ढमाले तसेच प्रशासन अधिकारी अशोक कदम व विभाग समन्वयक श्री माधव बाजगिरे हे उपस्थित होते. राज्य समन्वयक समितीने शिफारस केलेले श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावरील गीत सर्व २ हजार ६६६ शाळा व महाविद्यालयांमध्ये दररोजच्या परिपाठात गाण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हे गीत सर्व विद्यार्थ्यांना व समाजातील नागरिकांना श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची ओळख करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे डॉ. मठपती म्हणाले.

याशिवाय, जनजागृती मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमधून मंगळवार व बुधवार या दोन दिवसांत रॅली काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या रॅलीद्वारे विद्यार्थी व शिक्षक श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 'हिंद की चादर' या उपाधीचे महत्त्व व त्यांनी दिलेल्या बलिदानाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवतील, असे डॉ. मठपती यांनी सांगितले. या बैठकीला सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची ऑनलाइन उपस्थिती होती.

## थोडक्यात

### आत्महत्याग्रस्त, अत्यल्पभुधारक व अनाथ मुली होणार आत्मनिर्भर

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** युवती व महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने एक



महत्त्वाचे पाऊल उचलत आत्महत्याग्रस्त, अत्यल्पभुधारक शेतकऱ्यांच्या मुलींसह अनाथ मुलींना आत्मनिर्भर करण्याच्या उदात्त हेतुने दिव्या स्वयं सहाय्यता गट व बहुउद्देशीय संस्था निर्मित स्त्रीशक्ती नवनिर्माण महिला अकॅडमीच्या पुढाकारातुन वाशिममध्ये प्रथमच भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राला प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रशिक्षण केंद्राचा युवती व महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन अकॅडमीच्या संचालिका प्रा. संगीता चव्हाण यांनी केले आहे. या अकॅडमीच्या माध्यमातून पोलीस, वनविभाग, आर्मी तसेच इतर शासकीय सेवांतील भरतीसाठी अत्यल्प दरात दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील कष्टकरी, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुली, अत्यल्प उत्पन्न गटातील युवती तसेच अनाथ मुलींसाठी हे केंद्र आशेचा किरण ठरणार आहे. विशेष म्हणजे, अशा गरजू मुलींसाठी निशुल्क प्रशिक्षण वर्गही सुरू करण्यात येणार आहेत. आजही अनेक गुणवंत मुली केवळ आर्थिक अडचणींमुळे आपल्या स्वप्नांपासून दूर राहतात. मात्र 'स्त्रीशक्ती नवनिर्माण महिला अकॅडमी' त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारी ठरणार आहे. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची, गणवेश परिधान करून देशसेवेची संधी मिळवून देणारे हे केंद्र महिलांच्या आत्मनिर्भरतेचा मजबूत पाया ठरणार आहे. या प्रशिक्षण केंद्राचे संचालन प्रा. संगीताताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, त्यांनी युवती व महिलांनी या संधीचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. प्रशिक्षणासाठी अत्यंत कुशल व अनुभवी प्रशिक्षकांची टीम कार्यरत राहणार आहे. शिबीरामध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळांमध्ये ९० सुवर्णपदक विजेत्या पोलीस नाईक कु. संगीता ढोले ह्या निशुल्क प्रशिक्षण देणार असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ प्रशिक्षणार्थींना होणार आहे. तसेच प्राचार्य व लेखक प्रा. विठ्ठल गौरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यात संरक्षण व शासकीय सेवांचे क्षेत्रही मागे नाही. ही अकॅडमी म्हणजे महिलांच्या आत्मविश्वासाचा, संघर्षाचा आणि यशाचा नवा अध्याय ठरणार आहे. तरी वाशिम व परिसरातील सर्व युवती व महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्त्रीशक्ती अकॅडमीच्या वतीने करण्यात आले असून अधिक माहितीसाठी अकॅडमीचे कार्यालय तसेच दु.नं. ६, न.प. कॉम्प्लेक्स, सामान्य रुग्णालयासमोर वाशिम येथे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### लोणार सरोवरातील पाणीपातळी वाढीमुळे कमळजा माता मंदिरासह धार्मिक वारशाला धोका

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

✦ **प्रणव वराडे**

**लोणार :** लोणार सरोवरातील पाणीपातळी दिवसेंदिवस वाढत असून या वाढत्या पाण्यामुळे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेले कमळजा माता मंदिरासह सरोवर परिसरातील अनेक मंदिरे पाण्याखाली जाण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून प्रशासनाकडून अद्याप ठोस उपाययोजना राबविण्यात आलेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर कमळजा माता सेवा संघ व सर्व भाविक भक्तांच्या वतीने लोणार तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनामध्ये प्रशासनाकडे तातडीने खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत लोणार सरोवरात येणाऱ्या मोठ्या पाण्याच्या झऱ्यांचे तात्काळ डायव्हर्जन करण्यात यावे. पाणीपातळी नियंत्रणासाठी तज्ज्ञ समितीची तात्काळ नेमणूक करावी. • मंदिर व धार्मिक वारसा सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस व लेखी निर्णय जाहीर करावा. •कमळजा माता मंदिरासाठी एक अधिकृत पुजारी नियुक्त करून मंदिराची जबाबदारी स्पष्ट करावी. •दैनंदिन पूजा, आरती व धार्मिक विधी सुरळीतसुरू ठेवण्यासाठी स्थानिक सेवा संघाला तात्पुरता अधिकार द्यावा •सेवा संघाला डावलून मंदिरासंबंधी कोणताही निर्णय, ताबा किंवा व्यवस्थापन प्रक्रिया मान्य केली जाणार नाही. लोणार सरोवरातील मंदिरे पाण्याखाली जात असताना प्रशासन केवळ मूकदर्शकाची भूमिका घेत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. दिनांक 26 जानेवारी 2026 पर्यंत ठोस निर्णय न झाल्यास जलसमाधी व गावबंद आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही स्पष्ट करण्यात आले. निवेदनावर लोणार परिसरातील ३३ पेक्षा अधिक नागरिक व भाविकांच्या स्वाक्षऱ्या असून, या विषयाबाबत जनतेमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.



रमेश लांजेवार
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

भारत संग्राम

# महाराणा प्रताप ना कभी हारे ;ना अकबर कभी जीता !

**मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.**

चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप. महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला




जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.

ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला. महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले. यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली. मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला. आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

## संघटन कौशल्य दाखवा, राजकीय महत्त्व आपोआप मिळेल

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

✦ **प्रणव वराडे**

**लोणार :** समाजसंख्या कमी असल्याने दुर्लक्ष होत असल्यास त्यावर उपाय म्हणून संघटन कौशल्य दाखवा आणि कोणत्याही निवडणुकीत निवडून येण्याची क्षमता सिद्ध करा. तसे झाल्यास राजकीय महत्त्व आपोआप प्राप्त होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे विभागीय सचिव रमेश आकोटकार यांनी केले. १८ जानेवारी रोजी लोणार येथे आयोजित समाजाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महासभेचे जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे होते. प्रमुख अतिथी जानेवारी लोणारला आढावा म्हणून लोणारच्या नगराध्यक्षा मीरा मापारी, युवा संघटक जयेश भिसे, महिला जिल्हाध्यक्षा सुषमा राऊत, कार्याध्यक्ष ज्ञानदेव क्षीरसागर, युवा जिल्हाध्यक्ष तुषार काचकुरे, सचिव नंदकिशोर गायकवाड, जगन व्यवहारे, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर रायमूलकर, सहसचिव विजय सोनुने, प्रसिद्धी प्रमुख अशोक इंगळे आणि रोजी झाली बैठक नागेश सोनुने उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे यांनी समाजातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार मेळावा आयोजित करण्याची घोषणा केली. तसेच युवक संघटनांनी संघटन बळकट करण्याचे आवाहन त्यांनी केले. महिला जिल्हाध्यक्षा सुषमा राऊत यांनी सामाजिक कार्यात महिलांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाची सुरुवात श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पूजनाने झाली. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा मीरा मापारी, संतोष डोंबळे आणि अश्विनी क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्षा तसेच जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## हिंददीचादर या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची सोमवार 19 जानेवारी २०२६ रोजी नांदेड आकाशवाणीवर मुलाखत

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**नांदेड :** "हिंद दी चादर" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची नांदेड #आकाशवाणी चे #प्रसारण अधिकारी राहुल आत्राम यांनी घेतलेली मुलाखत सोमवार. दि. 19 जानेवारी २०२६ रोजी सकाळी 8 वाजून 40 मिनिटांनी नांदेड आकाशवाणीवरून प्रसारित होणार आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड येथील मोदी मैदानावर शासन आणि समाजाच्यावतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री व संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्वांनी योगदान द्यावे व या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. सर्व नांदेडकर, श्रोत्यांनी ही मुलाखत ऐकावी,असे आवाहन सहायक निदेशक तथा केंद्र प्रमुख विश्वास वाघमारे यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'संगमनेर पॅटर्न' संपूर्ण जिल्ह्यात राबवावा - ॲड. निलेश हेलोंडे

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**वाशिम :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा शासनाचा तसेच कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचा मुख्य उद्देश असून, पारंपरिक शेतीसोबत पूरक व्यवसाय, आधुनिक पिक पद्धती आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. संगमनेर पॅटर्न हा शेती विकासाचा यशस्वी नमुना असून, तो वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक



स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

मानोरा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीत शेतकऱ्यांसाठी विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी मानोरा तहसीलदार उमेश बन्सोड, गटविकास अधिकारी विलास जाधव, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ओ. रोम, बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. ॲड. पाटील म्हणाले की, चिया सारखी कमी खर्चाची व अधिक उत्पन्न देणारी पिके भविष्यातील शेतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यामुळे जिल्ह्यात चिया लागवड वाढवून त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना मूल्यवर्धनाचा लाभ मिळून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील. मानोरा तालुक्यात किमान एक हजार हेक्टर क्षेत्रावर चिया लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यावर त्यांनी भर दिला. दुध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून, त्यासाठी चारा लागवड अत्यावश्यक आहे. शेती, चारा आणि दुग्ध व्यवसाय यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्न मिळू शकते. यासाठी कृषी विभागाने चारा लागवडीबाबत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. शासनाच्या विविध योजना प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात की नाही, यावर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी दुग्ध व्यवसाय सुरू झाल्यास शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊन गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांनी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय व शेतीपूरक उद्योगांना चालना द्यावी, असे आवाहन करताना त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) चारा लागवडीचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. दि. ७ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार मानोरा तालुक्यातील कारखेडा येथे ई-क्लास जमिनीवर चारा लागवड प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी झटका मशिन व तार कुंपणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बैठकीस कारखेडा गावचे सरपंच , नागरिक तसेच पत्रकार उपस्थित होते.

भारत संग्राम (मराठी दैनिक) • RNI No. MAHMAR/2020/79677
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक "भारत संग्राम", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## थोडक्यात



### आश्रु बाबांच्या जयघोषात दुमदुमली संतनगरी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

✦ प्रणव वराडे

**लोणार :** तीर्थक्षेत्र असलेल्या संतनगरी जाफ्राबाद येथील ४९ व्या भव्य यात्रा उत्सव आश्रु बाबांच्या जय घोषात, भक्तीमय वातावरात १८ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. यावेळी शेकडो भाविकांनी पुरी, वांगे भाजीच्या महाप्रसादाचा लाभघेतला. संत आश्रु बाबा महाराजांचा ४९ व्या भव्य यात्रा महोत्सवात दूरवरून भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.प्रारंभी परमहंस अवलीय संत आश्रु बाबा महाराजांच्या मूर्तीची ब्राह्मणवृंद द्वारकाप्रसाद व्यास यांच्या मंत्रोच्यारात, केंद्रीय आयुष आरोग्य मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांच्या पत्नी राजश्रीताई जाधव, आमदार सिद्धार्थ खरात, सुवर्णाताई खरात. लोणार नगराध्यक्षा मीराताई भूषण मापारी, भूषण मापारी, मेहकर नगराध्यक्ष किशोर गारोळे, माजी आमदार संजय रायमूलकर यांच्या हस्ते संत आश्रु बाबा महाराज यांची महापूजा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर हभप धर्मभूषण रामकृष्ण हाडे गुरुजी यांचे काल्याचे कीर्तन पार पडल. तर मंदिरपासून ते संत अश्रु बाबा महाराजाच्या जन्मस्थळांपर्यंत गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कार्यक्रमात सहभागी झालेल्या सामाजिक, राजकीय, धर्मीक विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. संजय रामुकर, लोणार नगराध्यक्षा मीराताई भूषणमापारी, मेहकर नगराध्यक्ष किशोर गारोळे, रिसोड मतदार संघाचे आमदार अमित झनक, शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा. बळीराम मापारी, लोणार नगर सेवक भूषण मापारी, सभापती माधवराव जाधव, संतोष मापारी, प्रा. आशिष रहाटे, शैलेश सरकटे, दाभा येथील विजय मोरे, सुरेश प्रल्हाद प्रधान यांच्या सह भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. आश्रुबाबा यात्रा महोत्सवात भाविक भक्तांना पुरी-भाजीच्या महाप्रसादचे वाटप करण्यात आले. यावेळी ना. प्रतापराव जाधव, यांच्यापत्नी राजश्रीताई जाधव, आमदार सिद्धार्थ खरात, त्यांच्यापत्नी सुवर्णाताई खरात. नगराध्यक्षा मीराताई मापारी, भूषण मापारी, नगर अध्यक्ष किशोर गारोळे, माजी आ. संजय रायमूलकर, तहसीलदार भूषण पाटील आदींच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी संत अश्रुबाबा संस्थानचे सर्व विश्वस्त डॉ. मारोती मोरे, गजानान सरकटे, अंकुश मुंढे, पंजाब पोघे, गणपतराव भाग्यवंत, महसूल अधिकारी विष्णू केंद्रे, ग्राम महसूल अधिकारी संजाब इंगोले, विजय मोरे, शिवाजी मोरे, भगवानराव सुलताने, पुजारी गणेश महाराज ओव्हर, हभप सदाशिव महाराज मुंढे आदींची उपस्थिती होती.

### माजी सैनिकांसाठी 'आपदा मित्र' प्रशिक्षणाची सुवर्णसंधी; २७ जानेवारीपर्यंत अर्जाचे आवाहन

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीच्या काळात तातडीने मदतकार्य करण्यासाठी प्रशिक्षित स्वयंसेवक तयार करण्याच्या उद्देशाने, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने माजी सैनिकांसाठी 'आपदा मित्र' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पात्र माजी सैनिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण ९ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या माजी सैनिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे तांत्रिक धडे दिले जाणार आहेत. प्रशिक्षणाचे स्वरूप व फायदे: या प्रशिक्षण कालावधीत सहभागी माजी सैनिकांची निवासी व्यवस्था, चहा, नाश्ता आणि भोजनाची सोय पूर्णपणे मोफत करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक 'आपदा मित्रा'ला शासनामार्फत ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देखील दिले जाणार आहे. पात्रता आणि अटी: या प्रशिक्षणासाठी अर्ज करणारा उमेदवार हा माजी सैनिक असावा आणि त्याचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे, अशी अट घालण्यात आली आहे. अर्जाची प्रक्रिया: इच्छुक माजी सैनिकांनी आपले ओळखपत्र (Ex-Servicemen Identity Card), आधार कार्ड आणि पासपोर्ट साईज फोटोसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधून आपला अर्ज सादर करायचा आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २७ जानेवारी २०२६ ही आहे. आपत्तीच्या काळात समाजसेवेसाठी पुन्हा एकदा सज्ज होण्यासाठी जास्तीत जास्त माजी सैनिकांनी या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने केले आहे.

## पान एक वरून

सलमान खान आणि रश्मिका मंदाना अभिनीत 'सिकंदर' हा चित्रपट २०२५ मधील सर्वात मोठा फ्लॉप ठरला. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अत्यंत खराब कामगिरी केली आणि चित्रपटाचा खर्चही वसूल होऊ शकला नाही. आता चित्रपटाची नायिका रश्मिका मंदानाने चित्रपटाच्या अपयशावर भाष्य केले आहे. रश्मिकाने नुकतीच तेलुगू पत्रकार प्रेमासोबत 'सिकंदर'बद्दल चर्चा केली. तिने चित्रपटाबद्दल बोलताना सांगितले की, "नंतर जे घडले ते पूर्णपणे वेगळे होते, पण जेव्हा मी स्क्रिप्ट ऐकली होती, तेव्हा ती खरोखरच खूप वेगळी होती. पण चित्रपटांमध्ये असे अनेकदा घडते. जेव्हा तुम्ही ऐकता, तेव्हा ती एक वेगळी कथा असते. पण चित्रपट बनवताना, अभिनय, संपादन आणि प्रदर्शनाच्या वेळेनुसार गोष्टी बदलतात. ही खूप सामान्य गोष्ट आहे. 'सिकंदर'सोबतही असेच घडले." सांगायचं झाल्यास, सिकंदर फ्लॉप झाल्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक ए आर मुरुगदास यांनी भाषा आणि सलमान खानला दोषी ठरवलं होतं. त्यांनी आपल्या एका मुलाखतीत म्हटलं होतं की स्टार्ससोबत काम करणं सोपं नसतं.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने गठीत समित्यांचा सविस्तर आढावा

## सर्वांच्या सहकार्याने सामाजिक व धार्मिक सलोख्याचा कार्यक्रम यशस्वी करा – सचिव रुचेश जयवंशी

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**नांदेड :** शहरातील मोदी मैदानावर आयोजित "हिंद-दी-चादर" कार्यक्रमाची तयारी जोरात सुरू असून, या भव्य कार्यक्रमाचे सूक्ष्म व सुसूत्र नियोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी २६ विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून, या समित्यांमार्फत प्रत्येक लहान-मोठ्या बाबीचे नियोजन करण्यात आले आहे. सर्वांच्या समन्वयाने व सहकार्याने सामाजिक व धार्मिक सलोख्याचा हा कार्यक्रम यशस्वी होईल, अशी अपेक्षा अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रुचेश जयवंशी यांनी व्यक्त केली.

राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकी, उदासीन, भगत नामदेव (वारकरी संप्रदाय) व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने "हिंद-दी-चादर" कार्यक्रमाचे आयोजन मोदी मैदान, नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आज मोदी मैदानावर गठीत समित्यांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शहीदी समागम राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, शहीदी समागम समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, लातूर विभागाचे प्र. माहिती उपसंचालक विवेक खडसे, सर्व समित्यांचे नोडल अधिकारी, गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले यांच्यासह सर्व शासकीय व अशासकीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, सध्याच्या काळात सोशल माध्यमे ही प्रभावी प्रसिद्धीची साधने ठरत असून, त्यामध्ये इंस्टाग्राम हे अल्प कालावधीत मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचणारे प्रभावी माध्यम आहे. कोणत्याही कार्यक्रमाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. नांदेड येथे आयोजित "हिंद-दी-चादर" अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, इंस्टाग्रामसह विविध सोशल माध्यमांचा सकारात्मक व प्रभावी वापर करून हा कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावा. यासाठी स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवरील इन्फ्ल्युएन्सर्सनी पुढे येऊन सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. हा कार्यक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य, सेवा आणि बलिदानाचा संदेश देणारा ऐतिहासिक सोहळा असल्याने समाज माध्यमातून त्याचा आशय प्रभावीपणे प्रसारित करणे आवश्यक असल्याचेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी स्पष्ट केले. २६ शासकीय समित्यांच्या कामकाजाचा सखोल आढावा यावेळी "हिंद-दी-चादर" कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थापन करण्यात आलेल्या एकूण २६ शासकीय समित्यांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या व त्यांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. आवश्यक त्या सूचना देत समन्वय अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आला. याप्रसंगी समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे होणाऱ्या श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत संपूर्ण नियोजनाची माहिती दिली व संबंधित समिती सदस्यांना आवश्यक त्या सूचना केल्या.

## ग्राहक ( उपभोक्ता ) संरक्षण समितीच्या महिला जिल्हाध्यक्षपदी वर्षाताई इंगळे यांची निवड

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

✦ सचिन खंडारे



**बुलढाणा :** सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेले बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बीबी येथील माजी पंचायत समितीच्या सभापती सौ वर्षाताई सुनिल इंगळे यांची भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन द्वारा संचलित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या महिला बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे , सदर राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब केदारे 'व राष्ट्रीय सचिव डॉ अविनाश झोटिंग यांनी दिनांक १९ जानेवारी रोजी सदर निवड पत्र देऊन निवड केली आहे , ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती संपूर्ण देशभरात कार्यरत असून ज्या ज्या ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होते त्या फसवणूक झालेल्या ग्राहकांना न्याय व त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सदर समिती कार्यरत आहे , निवड झाल्याबद्दल वर्षा इंगळे यांनी सांगितले की यांनी सांगितले की बुलढाणा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची फसवणूक होत असते कृषी केंद्र असेल पेट्रोल पंप असेल बँक असेल मोबाईल दुकान असेल कापड दुकान असेल असेल अशा सर्व ठिकाणी ग्राहकांच्या आलेल्या तक्रारीवरून त्यांना त्यांची हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच जास्त प्रमाणात महिला ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्या जाते सदर हे सर्व प्रकार रोखण्यासाठी काम करणार असल्याचे सौ वर्षा इंगळे यांनी सांगितले ' तसेच बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्राहकांचे विशेषता महिलांमध्ये जनजागृती सुद्धा करणार असल्याचे त्यांनी सांगितले '

यावेळी त्यांचे निवडीबद्दल 'विदर्भ अध्यक्ष सचिन खंडारे, विदर्भ पदाधिकारी सुनील अंभोरे , विदर्भ पदाधिकारी डॉ गंगाराम उबाळे , बुलढाणा जिल्हाध्यक्ष शालिकराम चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे . ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या बुलढाणा महिला जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल वर्षा इंगळे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे ,


## ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या विदर्भ अध्यक्ष पदी सचिन खंडारे

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**बुलढाणा :** सामाजिक क्षेत्र पत्रकरिता क्षेत्रामध्ये नावलौकिक असलेले बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार सचिन खंडारे यांचे भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन द्वारा संचलित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या विदर्भ अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे , सदर राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब केदारे 'व राष्ट्रीय सचिव डॉ अविनाश झोटिंग यांनी दिनांक 18 जानेवारी रोजी सदर निवड पत्र देऊन निवड केली आहे , ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती संपूर्ण देशभरात कार्यरत असून ज्या ज्या ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होते त्या फसवणूक झालेल्या ग्राहकांना न्याय व त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सदर समिती कार्यरत आहे , निवड झाल्याबद्दल सचिन खंडारे यांनी सांगितले की बुलढाणा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची फसवणूक होत असते कृषी केंद्र असेल पेट्रोल पंप असेल बँक असेल मोबाईल दुकान असेल कापड दुकान असेल असेल अशा सर्व ठिकाणी ग्राहकांच्या आलेल्या तक्रारीवरून त्यांना त्यांची हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच बुलढाणा जिल्ह्यामध्ये एक सक्षम ग्राहक कसा उभा राहील यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले यावेळी त्यांचे निवडीबद्दल ' जिल्हाध्यक्ष शालिकराम चव्हाण , विदर्भ पदाधिकारी सुनील अंभोरे , डॉ गंगाराम उबाळे , यांनी अभिनंदन केले आहे .

## भुमीपुत्र हॉलीबॉल संघ मेहकर राज्यस्तरावर प्रथम



**भारत संग्राम | प्रतिनिधी**

**शिर्डी :** खेलो मास्टर्स गेम असोसिएशन महाराष्ट्र द्वारा आयोजित चौथी राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा 2026 शिर्डी येथे दिनांक 17 व 18 जानेवारी या दिवशी चौथी राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा पार पडली. त्यामध्ये 40 वर्षा वरील वयोगटांमध्ये भूमिपुत्र हॉलीबॉल संघ मेहकर यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून चंदिगड या ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरासाठी पात्र ठरले आहेत. या स्पर्धेमध्ये श्री सुचित जाधव सर, श्री मनोहर म्हळसने सर, श्री राजेश भाकडे सर, श्री सिद्धार्थ जाधव सर, श्री कृष्णा पिसे सर हे सर्व शिक्षक खेळाडू राष्ट्रीय स्तरासाठी पात्र ठरलेले आहेत,मेहकरात त्यासाठी त्यांचे कौतुक होत आहे

## बालविवाहमुक्तीसाठी चिमुकल्यांची सायकल शर्यत; लेक वाचवा लेक शिकवा अभियान; जनजागृती करण्यास चिमुकले सरसावले

**भारत संग्राम | प्रतिनिधी**



**नांदेड :** जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. अल्पवयीन मुलामुलींचे विवाह होत असतील तर त्यासंबंधीचे निर्बंध अधिक कडक केले आहेत. त्यामुळे मुख्य आरोपीसह मंगल कार्यालय, वाजंत्री, मंडप डेकोरेशन अशा सुविधा पुरविणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. सद्या बालविवाहाविरोधात मोठ्या प्रमाणावर जनजागृती सुरू आहे. जवळा दे. येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी बालविवाहमुक्तीसाठी सायकल शर्यतीत सहभाग घेतला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार, शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष किशनराव गच्चे, मारोती चक्रधर, हरिदास पांचाळ, पांडुरंग गच्चे यांची उपस्थिती होती.

बालविवाहमुक्तीसाठी लोहा तालुक्यातील जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील लोकांमध्ये बालविवाहाबाबतीत जागरुकता होणे गरजेचे आहे. कारण त्यांची मानसिकता बालविवाहास अनुकूल असतो. त्यासाठी लेक वाचवा लेक शिकवा अभियानांतर्गत यासंबंधाने उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. शाळेच्या वतीने गावातील ग्रामस्थांसाठी सायकल शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. यास शाळेतील चिमुकल्यांनी प्रतिसाद दिला. शर्यतीच्या सुरुवातीला बालविवाहमुक्तीचे नारे देण्यात आले. त्यानंतर शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष किशनराव गच्चे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. गावातील मुख्य रस्त्यावरून या शर्यतीचे आयोजन केले. शर्यतीनंतर विजेत्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने पारितोषिके वितरीत करण्यात आली.

## मालेगाव जागरूक नागरिक मंचाचा अभिनंदन सोहळा यशस्वीरित्या संपन्न!

**भारत संग्राम | प्रतिनिधी**

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** - मालेगाव जागरूक नागरिक मंचाच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका व स्वीकृत सदस्यांचा अभिनंदन सोहळा अभिनंदन समारंभ व मालेगांव विकासाची पुढील वाटचाल कार्यक्रम मोठ्या उत्साहात व सकारात्मक वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला विशेष म्हणजे हा कार्यक्रम कोणावरही टीका करण्यासाठी नसून, नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन, शुभेच्छा आणि मालेगावचे नागरिक तुमच्या पाठीशी आहेत हा विश्वास देण्यासाठी आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात फक्त बुद्धिजीवी, समजदार व शहरहिताची जाणीव असलेले नागरिक उपस्थित होते नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक-नगरसेविका हे सर्व नवीन चेहरे असल्याने त्यांना प्रशासनाची, शहरातील प्रश्नांची व अपेक्षांची माहिती देणे, तसेच योग्य दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता कार्यक्रमात मालेगाव शहरासमोरील स्वच्छता, अतिक्रमण, पाणीटंचाई, रस्ते, नाल्या आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली तसेच मागील दहा वर्षांपूर्वी पुढील सूत्र सांभाळण्यासाठी ज्यांनी 3 जानेवारी 2016 रोजी सायंकाळी राम मंदिर समोर शिव चौकामध्ये महाचर्चाचे आयोजन केले होते व हेल्पिंग हँड्स फाउंडेशन यांच्या साह्याने मालेगाव नगरीचा विकास आराखड्यावर झालेली प्रभावी महाचर्चा संदर्भात निवडणुकीदरम्यान उमेदवारांनी दिलेल्या आश्वासनांचे व्हिडिओ क्लिप स्क्रीनद्वारे दाखवण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना माजी प्राचार्य रतन आघमकर सर यांनी, पूर्वी झालेली शिव चौक येथे महाचर्चा घेण्यात आली त्यावेळी"ज्यांनी पूर्वी घोषणा केल्या पण पूर्ण केल्या नाहीत, तसे तुम्ही करू नका, हीच या चर्चेतील जाणीव समजावी", असे स्पष्ट शब्दांत प्राचार्य आघमकर सर यांनी सांगितले या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक माजी प्राचार्य श्री.रतन आघमकर सर होते सूत्रसंचालन प्रा.अनिल सोळंके सर यांनी केले प्रास्ताविक जिया अहमद खान सर यांनी मांडले, तर सन्मानपत्र वाचन डॉ.पुरुषोत्तम देवळे सर यांनी केले आभार प्रदर्शन डॉ.संतोष जाधव यांनी केले कार्यक्रमाच्या सुरुवातीला हरनारायण मंगल कार्यालयचे मालक कै.काशिनाथ काटेकर (पोलीस पाटील) यांना दोन मिनिटांची श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे, नगरउपाध्यक्षा राधाताई महादेव खवले तसेच सर्व प्रभागातील नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते त्यामध्ये प्रभाग १: सौ.वनमाला प्रेमानंद डाखोरे, प्रभाग २: सौ.रज्जू गजानन काळे, प्रभाग ३: सोनाजी रामेश्वर घुगे, प्रभाग ४: शहा मरियमबी शाबीर शहा, प्रभाग ५: आजाद खान अजिज खान पठाण, प्रभाग ६: सौ.सविता संजय सारडा, प्रभाग ७: ज्योती सखाराम सौभागे, प्रभाग ८: इंदिराबाई कैलास गुजरे, प्रभाग ९: विनोद माणिकराव बानाईतकर, प्रभाग १०: प्रियंका अभय घुगे, प्रभाग १२: ज्ञानेश्वर रमेश काटेकर, प्रभाग १३: राधा दयाराम गायकवाड, प्रभाग १४: सलीमाबी हारून शेख, प्रभाग १५: संजय रामभाऊ बळी, प्रभाग १६: योगेश रामचंद्र बळी, प्रभाग १७: निलेश गोपाल, मानधने, गजानन नारायण सारसकर, व गणेश रामप्रसाद अहिर, या सर्वांचा पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह (मोमेंटो) देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाला मालेगाव जागरूक नागरिक मंचचे अनेक सदस्य उपस्थित होते त्यामध्ये प्रा.रतन आघमकर, प्रा.जिया अहमद खान, प्रा.सुधाकर पखाले सर, जि.प.शिक्षक प्रा. अनिल सोळंके, धीरज शहाणे, डॉ.संतोष जाधव, डॉ.सतीश घुगे, डॉ.पुरुषोत्तम देवळे, डॉ.जुलकर नैन मालवी, डॉ.अनुप सांबारे, डॉ.सचिन चाफे, अमोल कल्याणकर, डॉ.ओंकार शेटे, महेश भुतडा, अभिषेक मुंदडा, प्रदीप सावले, आशुतोष कंकाळ, ललित संचीती, योगेश मुंढरे, संदीप लहटे, संतोष सरकटे, निलेश घुगे, अनुप बिरला, कृष्णा जाजू, सय्यद इमरान, जयदेव शेळके, अजय घुगे, विशाल बनचरे, गजानन काळे, अभिषेक देवकते आदींचा समावेश होता एकूणच हा कार्यक्रम टीका नाही तर विचार, विरोध नाही तर मार्गदर्शन आणि राजकारण नाही तर शहरहित या भूमिकेतून पार पडल्याने मालेगावच्या सामाजिक व राजकीय इतिहासात एक सकारात्मक आदर्श निर्माण करणारा ठरला.या कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाची समाप्ती घेण्यात आली "समाजासाठी जगणं हाच खरा धर्म, सेवेतूनच घडतो माणूस" या ब्रीदवाक्याप्रमाणे मालेगाव जागरूक नागरिक मंच भविष्यातही शहरहितासाठी कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात



### समाजाची संख्या कमी असली की कोणी महत्व देत नाही - रमेश आकोटकार

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ सचिन खंदारे

**बुलढाणा :** समाजाची संख्या कमी असली की कोणी महत्व देत नाही , त्यासाठी प्रथम आपले संघटन कौशल्य दाखवा आणि कोणत्याही निवडणुकीमध्ये निवडून येण्याची क्षमता सिद्ध करा आपोआपच राजकीय नेते पायघड्या घालीत आपल्याकडे येतील असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे विभागीय सचिव रमेश आकोटकार यांनी केले . ते लोणार सरोवर येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष सुभाष देव्हडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून लोणारच्या नगराध्यक्षा मिराताई भुषण मापारी , महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे युवा संघकट जयेश भिसे , महिला जिल्हाध्यक्षा सुषमाताई राऊत , कार्याध्यक्ष ज्ञानदेव क्षिरसागर , युवा जिल्हाध्यक्ष तुषार काचकुरे , सचिव नंदकिशोर गायकवाड , जगन दादा व्यवहारे , जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर रायमुलकर , सहसचिव विजय सोनुने , प्रसिध्दी प्रमुख अशोक इंगळे , नागेश सोनुने उपस्थित होते . समाजातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार मेळावा घेऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आमची असून लवकरच असा मेळावा आयोजित करण्यात येईल . त्यासाठी समाजातील युवक संघटना यांनी युवकांचे संघटन वाढविले पाहिजे असे विचार जिल्हा अध्यक्ष सुभाष देव्हडे यांनी मांडले . महिला वर्गाची उपस्थिती खुपचं कमी असून यानंतर सामाजिक कार्यात महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यासाठी महिलांची संख्या जास्तीत जास्त दिसली पाहिजे . असे मत महिला जिल्हाध्यक्षा सुषमाताई राऊत यांनी मांडले . सर्वप्रथम श्री संत संताजी जगनाडे महाराज यांचे पुजन मान्यवरांनी केले . यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ मिराताई भुषण मापारी , संतोष डोंबळे , अश्विनी क्षिरसागर यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले . नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ मिराताई मापारी यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला . तर महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी यांचाही सत्कार करण्यात आला . कार्यक्रमाचे संचालन गोरखनाथ राऊत यांनी केलं . कार्यक्रमाचे आयोजन समस्त संताजी मंडळाने केले होते .

### फातिमाबी साहित्य संमेलनात प्रवीण बागडे यांचा काव्यवाचनासाठी सन्मान

भारत संग्राम | प्रतिनिधी

**श्रीरामपूर :** भारताच्या पहिल्या मराठी मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी ऑकेशन्स बँक्वेट हॉल, बेलापूर रोड येथे आयोजित चौथे राज्यस्तरीय "युगस्त्री फातिमाबी शेख" साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनातील कवी संमेलन सत्रात सामाजिक आशय असलेल्या प्रभावी काव्यवाचनासाठी नागपूर येथील साहित्यिक प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा गौरव करण्यात आला. 'युगस्त्री फातिमा माई' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना मराठी भाषांतरित पवित्र कुरआन, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. फातिमा शेख यांच्या कार्याचा गौरव करताना फातिमाबी शेख प्रतिनिधिक काव्यसंग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी, फातिमाबींची जयंती शाळा-महाविद्यालये तसेच शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये व्यापक पातळीवर साजरी व्हावी, तसेच त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ठोस प्रयत्न होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कविसंमेलन नूरजहां शेख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या कवींनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले, तर आभारप्रदर्शन शफी सैय्यद यांनी केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या फातिमाबी शेख यांच्या स्मृतीला उजाळा देणारे हे संमेलन साहित्यप्रेमींमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरले.

# लोणार नगर परिषदेकडून रोड डस्ट क्लिनर मशिनचा शुभारंभ

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रणव वराडे



**लोणार :** लोणार शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने लोणार नगर परिषदेमार्फत अत्याधुनिक रोड डस्ट क्लिनर मशिनचा शुभारंभ करण्यात आला. नवनियुक्त नगराध्यक्षा मिरा भूषण मापारी यांनी पदभार स्वीकारताच तात्काळ लोकहिताच्या कामांना सुरुवात करत या मशिनचे पुजन करून उद्घाटन केले. त्यांच्या कार्यकाळातील हे पहिलेच महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

लोणार शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात धूळ, माती व कचरा साचत होता. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून प्रदूषणात वाढ होत होती. या पार्श्वभूमीवर रोड डस्ट क्लिनर मशिनची आवश्यकता होती. ही मशिन रस्त्यांवरील धूळ, रेती, माती व लहान कचरा प्रभावीपणे साफ करणार असून शहर स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यास मदत करणार आहे.उद्घाटनप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा मिरा भूषण मापारी म्हणाल्या, "लोणार हे ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. शहराची स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि नागरिकांचे आरोग्य ही आमची प्राथमिकता आहे. पदभार स्वीकारताच विकासात्मक व जनहिताच्या कामांना सुरुवात केली असून आगामी काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, प्रकाश व्यवस्था यावर विशेष लक्ष दिले जाईल." दररोज सायंकाळी व्यापारी रस्त्यावर तसेच आवश्यक त्या ठिकाणी ही मशिन पाठवण्यात येईल. लोणार शहरातून मुख्य रस्ता जात असल्याने नेहमी नागरिकांची व वाहनांची वर्दळ असते. यामुळे कचरा रस्त्यावर न जाळता तो कचरा पेटीत टाकून सहकार्य करावे. आपल्या सहकार्यातून स्वच्छतेच्या दृष्टीने ऐक ऐक पाउले उचलता येतील. या मशिनमुळे मनुष्यबळावरील ताण कमी होणार असून स्वच्छता अधिक जलद आणि प्रभावीपणे होणार आहे. तसेच रस्त्यांवरील धूळ कमी झाल्याने श्वसनविकार, डोळ्यांचे आजार यासारख्या समस्यांमध्ये घट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रोड डस्ट क्लिनर मशिनच्या शुभारंभामुळे 'स्वच्छ लोणार, सुंदर लोणार' या संकल्पनेला बळ मिळाले असून नगर परिषद विकासाच्या दिशेने ठोस पावले टाकत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. नगर परिषद उपाध्यक्ष आबेद खान मोमिन खान, गटनेत्या सिमा नितिन शिंदे व गटनेते मयुर गोलेच्छा यांनी नारळ फोडून कार्य शुभारंभ केला. यावेळी माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, नगरसेविका वर्षा संतोष मापारी, नगरसेविका संध्या शाम राऊत, नगरसेवक साहेबराव पवार, नगरसेवक अनिकेत मापारी, नगरसेवक अ.उबेद अ. मुनाफ, नगरसेविका हुमेरा सदफ शेख जमिल, नगरसेविका पायल शुभम भगत, नगरसेविका नगमा बी शेख जावेद, नगरसेवक शे. मकसुद शे. उस्मान, नगरसेविका सुप्रिया गजानन मापारी, नगरसेवक गजानन शालिकराम मापारी, नगरसेविका शोभा भागवत देसाई यांच्यासह माजी शहराध्यक्ष नितिन शिंदे, संतोष मापारी, गजानन मापारी, जमील शेख, शुभम देसाई यांच्यासह स्वच्छता कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी नगर परिषद आणि नगराध्यक्षा यांच्या या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

## भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

भारत संग्राम | प्रतिनिधी

**ठाणे :** ग्रूप ग्रामपंचायत चेरपोली–बामणे हद्दीत मागील काही दिवसांपासून बाहेरील व भटक्या कुत्र्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली असून त्यामुळे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहापूर तालुका सचिव रविंद्र लकडे यांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

सदर निवेदनात गावातील विविध ठिकाणी कुत्र्यांचा मुक्त संचार वाढल्याने अपघात व चावण्याच्या घटनांची शक्यता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असल्याचेही निदर्शनास आणून दिले आहे.

भटक्या व बाहेरील कुत्र्यांचा योग्य तो बंदोबस्त करण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधून तात्काळ उपाययोजना कराव्यात. तसेच कुत्र्यांचे लसीकरण व निर्बीजिकरण (स्टेरिलायझेशन) कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृती करणाऱ्या एनसीसी कॅडेट्सचा सन्मान

भारत संग्राम | प्रतिनिधी




**वाशिम :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी निलेश पळसकर व निलेश गायकवाड आणि जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांच्या निर्देशानुसार हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

या उपक्रमांतर्गत पोस्टर, निबंध व रांगोळी स्पर्धांसह लोकशाहीचे महत्त्व पटवून देणारे विविध जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. वाशीम, मालेगाव, मंगरुळपीर, कारंजा व रिसोड येथे श्री बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सनी फ्लॅश मॉब व पथनाट्य सादर करून नागरिकांना मतदानासाठी प्रेरित केले. त्यांच्या सादरीकरणातून लोकशाही सहभागाचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित झाले. रांगोळी स्पर्धेत विघ्नेश वानखेडे, नम्रता इंगळे व समीक्षा घुगे, पोस्टर स्पर्धेत रजत कुटे, सेजल सरनाईक व अनुष्का मोरे, तर पत्रलेखन स्पर्धेत प्रथमेश पते, अनुजा काकडे व अथर्व चांगटे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. पथनाट्यात आरती गंगावणे, मनीषा भालेराव व मंदार ईढोळे यांनी प्रभावी अभिनयातून मतदानाचा संदेश दिला. तसेच मतदानाच्या दिवशी ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्याचे स्वयंसेवी कार्यही एनसीसी कॅडेट्सनी जबाबदारीने पार पाडले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांच्या हस्ते सर्व एनसीसी कॅडेट्सना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, एनसीसी अधिकारी अमोल काळे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी कॅडेट्सच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मालेगाव नगरपंचायतीत सभापती पदांचे वाटप पूर्ण!; पाच समित्यांवर पदाधिकाऱ्यांची निवड

भारत संग्राम | प्रतिनिधी

✦ प्रदीप सावले



**मालेगाव :** नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर उर्वरित राहिलेल्या सभापती पदांच्या वाटपाकडे शहराचे लक्ष लागले होते नगराध्यक्षपदी शिंदेसेनेचे ओमप्रकाश खुरसडे व उपनगराध्यक्षपदी राधा महादेव खवले यांची निवड झाल्यानंतर अखेर सोमवार,दि.१९ जानेवारी रोजी सभापती पदांचा निवड कार्यक्रम पार पडला या निवड प्रक्रियेत एकूण पाच सभापती पदांची निवड करण्यात आली त्यामध्ये शिंदेसेनेला तीन,भाजपला एक व काँग्रेसला एक असे सभापती पदांचे वाटप झाले. शिंदेसेनेचे आझाद खान पठाण यांची पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या सभापतिपदी,तर सविता सारडा यांची आरोग्य व शिक्षण समितीच्या सभापतिपदी निवड झाली भाजपचे संजय बळी यांच्याकडे बांधकाम समितीचे सभापतीपद सोपविण्यात आले काँग्रेसच्या सलिमाबी हारून शेख यांना महिला व बालकल्याण समितीच्या सभापतिपदाची जबाबदारी देण्यात आली तसेच उपनगराध्यक्ष राधा महादेव खवले यांच्याकडे नियोजन व विकास समितीचे सभापतीपद देण्यात आले. नगरपंचायतीतील सध्याच्या राजकीय संख्याबळानुसार शिंदेसेनेचे ८,काँग्रेसचे ६ व भाजपचे ३ नगरसेवक आहेत निवडणूक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी उपजिल्हाधिकारी दीपक बाजड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली,तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पंकज सोनुने यांनी कामकाज पाहिले सभापती पदांची निवड जाहीर होताच नवनिर्वाचित सभापतींच्या समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी व गुलाल उधळत जल्लोषात आनंद साजरा केला. नगरपंचायतीच्या कामकाजाला आता समित्यांच्या माध्यमातून अधिक गती मिळेल,अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## शिक्षक सिद्धार्थ जाधव ह्यांचा सत्कार



भारत संग्राम | प्रतिनिधी

**मेहकर :** खेलो मास्टर्स गेम असोसिएशन महाराष्ट्र द्वारा आयोजित चौथी राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा 2026 शिर्डी येथे दिनांक 17 व 18 जानेवारी या दिवशी चौथी राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा पार पडली. त्यामध्ये 40 वर्षा वरील वयोगटांमध्ये भूमिपुत्र हॉलीबॉल संघ मेहकर यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून चंदिगड या ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरासाठी पात्र ठरले आहेत. या स्पर्धेमध्ये राजश्री प्राथमिक शाळेचे शिक्षक सिद्धार्थ जाधव हे खेळाडू राष्ट्रीय स्तरासाठी पात्र ठरलेले आहेत,त्या निमित्ताने मेहकर येथे राजश्री प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अजिंक्य बार्डेकर ह्यांनी त्यांचा सत्कार केला ह्यावेळी शाळेतील कर्मचारी विजय फंगाळ,विकास भोसले,रामेश्वर इंगळे,सचिन राठोड तसेच शिक्षिका मनीषा वानखेडे,संध्या ठोकरे,ज्योती बिलघे उपस्थित होत्या.

# हिंद दी चादर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा लोकप्रतिनिधी व मान्यवरांकडून आढावा

भारत संग्राम | प्रतिनिधी



**नांदेड :** तख्त सचखंड श्री हुजूर साहिब नांदेड येथे आयोजित "हिंद दी चादर" श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा आज लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी घेतला.

जिल्हा नियोजन भवनच्या सभागृहात खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार सर्वश्री राजेश पवार व जितेश अंतापूरकर, मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, हिंद दी चादर कार्यक्रमाचे समन्वयक तथा कार्यकारी अधिकारी जगदीश सकवान, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना खासदार अशोकराव चव्हाण यांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव वारकरी संप्रदायांचे योगदान अविस्मरणीय ठरावे, यासाठी हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणारा व लोकांच्या स्मरणात राहणारा ठरावा, असे त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने हा ऐतिहासिक कार्यक्रम होत असून नांदेडचे महत्व लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली येथे आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमासाठी देशभरातून भाविक येणार असून त्यांच्यासाठी 6 नियमित व 5 विशेष विमानसेवा तसेच 5 विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. विमानतळ व रेल्वेस्थानकावर भाविकांना माहितीपत्रक देणे, गुरुद्वारा व कार्यक्रमस्थळाकडे जाण्यासाठी बससेवा उपलब्ध करणे, स्वागतासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करणे तसेच मान्यवरांसाठी पासेसची व्यवस्था करण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या. कार्यक्रमातील सर्व सुविधा विनामूल्य असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक यांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची माहिती देत राज्यात हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम नागपूर, नांदेड व मुंबई येथे आयोजित करण्यात येत असल्याचे सांगितले. पहिल्या टप्प्यात 7 डिसेंबर रोजी नागपूर येथे कार्यक्रम झाला असून 24 व 25 जानेवारी 2026 रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला देशाचे गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, संत-महंत उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की, शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड नगरी ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार ठरणार आहे. 52 एकरांच्या परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती उभारण्यात येत असून भाविकांच्या सोयीसाठी महालंगर, अत्याधुनिक प्रदर्शन केंद्र, साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स व आरोग्य शिबिरे उभारली जात आहेत. पार्किंग व वाहतूक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला असून कोणत्याही भाविकाची गैरसोय होणार नाही, असे त्यांनी सांगितले. सर्व नांदेडकरांनी व भाविकांनी सहकुटुंब या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे व माजी आमदार अमर राजूरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आवश्यक सूचना केल्या. या बैठकीस विविध लोकप्रतिनिधी, नागरिक, अधिकारी व कर्मचारी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वाशिम जिल्ह्याचा ऐतिहासिक आवाज 'दै. भारत संग्राम'ला हवी आहे तुमच्यासारख्या

# जबाबदार प्रतिनिधींची साथ!




## तालुका प्रतिनिधी

## शहर प्रतिनिधी

## ग्रामीण वार्ताहर



वाशिम जिल्ह्याच्या मातीशी नाळ जोडलेली, अनेक पिढ्यांचा विश्वास असलेली आपली पत्रकारितेची परंपरा 'दै. भारत संग्राम' आता एका नव्या, भव्य स्वरूपात आपल्या भेटीला येत आहे. या दिवाळीत, आम्ही केवळबातम्या नाही, तर जिल्ह्याच्या विकासाचा आणि सन्मानाचा एक नवा अध्याय सुरू करत आहोत. आणि या मिशनमध्ये आम्हाला

## हवी आहे तुमची साथ!

## आमची नजर आहे तुमच्या गावावर, तुमच्या शहरावर!

आम्ही विशेषतः खालील तालुक्यांतील प्रमुख गावांमध्ये प्रतिनिधी नेमण्यास प्राधान्य देत आहोत. तुमच्या गावातूनच जिल्ह्याचा आवाज बुलंद करा!

| | |
|---|---|
| वाशिम तालुका | अनसिंग, काटा, जवळा, तोंडगाव, पार्डी टकमोर, राजगाव. |
| मंगरूळपीर तालुका | शेलूबाजार, आसेगाव, चांभई, कवठळ, धानोरा, पेडगाव. |
| मानोरा तालुका | पोहरादेवी, इंझोरी, गव्हा, कोंडोली, फुलउमरी, शेंदुर्जना. |
| मालेगाव तालुका | शिरपूर जैन, मेडशी, झोडगा, अमानी, पांगरी, जऊळका. |
| रिसोड तालुका | लोणी, केनवड, भर जहागीर, गोवर्धन, हराळ, नेतन्सा. |
| कारंजा लाड तालुका | कामरगाव, मनभा, पोहा, धानोरा, पिंपरी, बेबळा. |

(टीप: या व्यतिरिक्तही जिल्ह्यातील प्रत्येक गावातील इच्छुक व्यक्तींनी संपर्क साधावा.)

## एक फोन लावा आणि बदला तुमचे आयुष्य!

**डॉ. माधव हिवाळे**
मुख्य संपादक, वाशिम

या सुवर्णसंधीसाठी आजच थेट संपर्क साधा.
**9765332897**